# 10. मूलभूत कर्तव्ये

## भाग IV (अ) कलम 51 (अ)

- जगात रशिया, जपान, व्हिएतनाम आणि नेदरलँड व भारत या पाच देशाच्या घटनेत मुलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला असून भारताने रशियाच्या राज्यघटनेतून मुलभूत कर्तव्याचा स्वीकार केलेला आहे.
- भारताच्या मूळ घटनेत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला नव्हता पुढे सरदार स्वर्ण सिंह समितीच्या शिफारशीवरुन 1976 मध्ये 42 व्या घटना दुरुस्तीने घटनेत 10 मुलभूत कर्तव्यांची यादी समाविष्ट
- 2002 मध्ये 86 व्या घटनादुरुस्तीने 11 वे मूलभूत कर्तव्य टाकण्यात आले.
- कलम 51 A मध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्य दिली आहेत.
- सध्या घटनेत 11 मूलभूत कर्तव्ये आहेत.

**सरदार स्वर्ण सिंह समिती 1976** :

- आणीबाणीच्या काळात निर्माण झालेल्या गरजेमुळे भारत सरकारने 1976 मध्ये मूलभूत कर्तव्यांसाठी सरदार स्वर्ण सिंह समिती स्थापन केली.
- या समितीद्वारे मूलभूत कर्तव्यांचे एक स्वतंत्र प्रकरण घटनेत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली.
- या शिफारसीवरुन तात्कालीन काँग्रेस सरकारने 42 व्या घटनादुरुस्ती (1976) अन्वये घटनेत भाग IVA समाविष्ट करण्यात आला.
- कलम 51 A हे 10 मुलभूत कर्तव्यांची यादी असलेले कलम समाविष्ट केली.
- स्वर्णसिंह समितीने केवळ 8 कर्तव्यांची शिफारस केली होती.
- मुलभूत कर्तव्यांच्या यादीपैकी 86 व्या घटनादुरुस्तीने 2002 ने पुढील कर्तव्य समाविष्ट केले आहे.
- जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने पाल्यास वयाच्या 6 व्या ते 14 व्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.
- तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी व कायदा मंत्री H. R. गोखले यांनी घटनेत मूलभूत कर्तव्य समाविष्ट करण्याचे समर्थन केले.
- इंदिरा गांधी यांच्या मते - मूलभूत कर्तव्यांचे नैतिक मूल्य लोकांना आपल्या हक्कांबरोबरच आपल्या कर्तव्यांची जाणीव निर्माण करुन लोकशाही संतुलन प्रस्थापित करेल.
- तत्कालीन विरोधी पक्षानेही यास विरोध केला नाही.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- मोरारजी देसाई यांनी जनता पार्टी सरकारने 43 व्या 44 व्या घटनादुरुस्ती अन्वये (1977 व 1978) 42 व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट तरतुदी काढण्याचा प्रयत्न केला पण मूलभूत कर्तव्याला स्पर्श केला नाही.
- नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांवरील वर्मा समितीने (1999) मु. क. अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या कायदयाच्या तरतुदींची ओळख केली होती.

**मुलभूत कर्तव्याची वैशिष्ट्ये :-**

- मूलभूत हक्क नागरिकांना व परकियांना उपलब्ध होतात मात्र मूलभूत कर्तव्य केवळ भारतीय नागरिकांना लागू होतात.
- मुलभूत कर्तव्य न्यायप्रविष्ठ नसतात.
- सकारात्मक व नकारात्मक असतात.
- नागरी आणि नैतिक असे दोन स्वरुपाचे असतात.
- मुलभूत कर्तव्य जनतेकडून केलेल्या अपेक्षा असतात.

**मुलभूत कर्तव्यांची यादी - (कलम 51A)**

1) घटनेचे पालन, तिचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2) राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा या आदर्शाची जोपासना व अनुकरण करणे.
3) भारताचे, एकता, एकात्मता उन्नत ठेवणे व रक्षण करणे.
4) देशाचे संरक्षण व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.
5) धार्मिक, भाषिक वादाच्या पलीकडे जाऊन जनतेमध्ये सामंजस्य, बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.
6) संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारशांचे मोल जाणणे व जतन करणे.
7) नैसर्गिक पर्यावरणांचे रक्षण व सुधारणा, प्राण्यांविषयी दया बाळगणे.
8) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद व शोधकबुध्दी, सुधारणावाद यांचा विकास करणे.
9) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण व हिसांचाराचा त्याग करणे.
10) राष्ट्र उपक्रम व श्रेणी यांत चढता क्रम गाठला जाईल अशा प्रकारे उत्तमता संपादनासाठी सतत झटणे.
11) 86 व्या घटनादुरुस्तीने 2002 ने जो जन्मदाता / पालक असेल त्याने पाल्यास वयाच्या 6 ते 14 वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.

**मूलभूत कर्तव्याचे महत्त्व :-**

- देश, समाज व इतराप्रती कर्तव्याची आठवण.
- राष्ट्रविरोधी व समाजविरोधी कृत्यांना पायबंद.
- शिस्त आणि जबाबदारीची जाणीव.

**मूलभूत कर्तव्यावरील सर्वोच्च न्यायालयातील खटले :-**

- **1970 - चंद्रभवन बोर्डींग विरुद्ध म्हैसूर सरकार.**
  राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्क असणे आणि मुलभूत कर्तव्य नसणे हा एक विरोधाभास आहे. त्यामूळे घटनेत मुलभूत कर्तव्याचा समावेश करावा
- **1988 - एम.सी. मेहता विरुद्ध भारतीय संघराज्य.**
  देशातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये नैसर्गिक पर्यावरणाच्या संरक्षण आणि सुधारणे करिता आठवड्यातील किमान एक तास पर्यावरणाबाबत शिकविणे अत्यावश्यक आहे.
- **1992 - मोहन सिंघानिया विरुद्ध भारतीय संघराज्य.**
  UPSC व MPSC द्वारे निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते ते कलम 51-अ नुसार .

**मूलभूत कर्तव्यावरील टीका :-**

- राजकर्त्यावरील जबाबदारीचा अनुल्लेख.
- मूलभूत कर्तव्याची यादी अपुरी.
- नागरिकांच्या गुलाबाची सनद.
- न्यायाप्रविष्ठ नसतात.
- भाग 3 ला जोडावयास हवी होती.